# जाहिरात.

१) पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील मोटार परिवहन विभागातील पोलीस वाहनासाठी लागणारे सुटेभागाचा पुरवठा करणे करीता वार्षीक करार वित्तीय वर्ष सन २०२३-२४ करणेसाठी सिलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. प्रत्येक कामाचे स्वतंत्र सिलबंद दरपत्रक सादर करावे. प्रत्येक लिफाफ्यावर कामाचे/दरपत्रकाचे स्वरुप व पुरवठादाचे नांव लिहिण्यात यावेत.

**(A) सर्व प्रकारच्या वाहनांना विविध प्रकारचे कंपनीचे सुटेभागांचा पुरवठा करणे**

| अ.क्र | काम क्रमांक | वाहनाचा प्रकार | मुळ किंमतीवर देण्यांत येणारी सुट % |
|---|---|---|---|
| १ | काम नं.१ | आयशर बनावटीच्या सर्व प्रकारच्या चारचाकी वाहनांचे दुरुस्तीसाठी लागणारे सुटेभागाचा पुरवठा करणे | |
| २ | काम नं.२ | महिंद्रा ॲण्ड महिंद्रा पॅसेंजर वाहनांचे सुटेभागाचा पुरवठा करणे | |
| ३ | काम नं.३ | ऑटो ईलेक्ट्रीक सुटेभागाचा पुरवठा करणे | |
| ४ | काम नं.४ | एस.एम.एल.वाहनांचे सुटेभागाचा पुरवठा करणे | |
| ५ | काम नं.५ | टाटा कमर्शियल वाहनांचे सुटेभागाचा पुरवठा करणे | |
| ६ | काम नं.६ | मारुती सुझुकी वाहनांचे सुटेभागाचा पुरवठा करणे | |
| ७ | काम नं.७ | बजाज मोटार सायकल वाहनांचे सुटेभागाचा पुरवठा करणे | |
| ८ | काम नं.८ | हिरो मोटार सायकल वाहनांचे सुटेभागाचा पुरवठा करणे | |
| ९ | काम नं.९ | वाहनांचे ॲटोमोटीव्ह बॅटरीजचा पुरवठा करणे | |
| १० | काम नं.१० | टोयोटा वाहनांचे सुटेभागाचा पुरवठा करणे | |
| ११ | काम नं.११ | फोर्स वाहनांचे सुटेभागाचा पुरवठा करणे | |
| १२ | काम नं.१२ | महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कमर्शियल वाहनांचे सुटेभागाचा पुरवठा करणे | |
| १३ | काम नं.१३ | पी.ए.सिस्टीम खरेदी | |

नियम व अटी :-

२) सदरचे दरपत्रकामध्ये दर GST/ सर्व करासहीत दर नमुद करुन सिलबंद दरपत्रक दि. १३/०२/२०२३ ते दि. १७/०२/२०२३ रोजी पावेतो सकाळी ०९.४५ ते १८.१५ या कार्यालयीन कामाचे वेळेमध्ये आवक जावक शाखा, पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद शहर येथील बंद निवीदा पेटीमध्ये टाकावीत.

३) पुरवठादार यांनी दरपत्रकासोबत GST No., Pan Card छायांकीत प्रत सादर करावी. तसेच दरपत्रक/कोटेशनमध्ये GST No. नमुद करणे आवश्यक आहे.

४) दरपत्रक मंजुर करणेचे अथवा रद्द करणेचे सर्व अधिकार मा.पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर यांना राहतील. त्याबाबतची कारणे सर्व संबंधितास कळविणे हे या कार्यालयास बंधनकारक असणार नाही याची नोंद घ्यावी.

५) संस्था/पुरवठाधार यांचे दुकान नोंदणी प्रमाणपत्राची छायांकीत प्रत सादर करावी.

६) न्युनतम दराचे दरपत्रक मंजुर झाल्यानंतर यशस्वी निविदाधारकास कार्यादेश देण्यात येतील. व कार्यादेशाप्रमाणे अटी व शर्तीनुसार व मान्य केलेले दरानुसारच सुटेभाग पुरवठा करणे/ दुरुस्तीची कामे करणे बंधनकारक राहील. त्यासाठी कोणत्याही प्रकारचा वेगळा वाहतुक खर्च अनुज्ञेय राहणार नाही.

७) शासन निर्णय क्रमांक उर्जा व कामकार विभाग शासन निर्णय क्रमांक मांखस/प्रक्र-८२/भाग-१११/उद्योग-४ दिनांक.०१/१२/२०१६ मधील नियम ६.४ परि.४-अ प्रमाणे कामामध्ये विलंब झाल्यास दंडनीय शुल्काची रक्कम पुरवठाधारकाकडून वसुल करण्यांत येईल.

८) देयकातुन प्रचलीत शासन नियमानुसार २% आयकर व २% GST कपात करुन उर्वरित रक्कम देय राहील.तसेच मान्य केलेले दर सर्व करासहीत असलेने ईतर कोणत्याही प्रकारचा कर अथवा खर्च अनुज्ञेय राहणार नाही. व मंजुर केलेले दराप्रमाणे देयकाची आकारणे करणे बंधनकारक राहील.

९) सुटेभाग पुरवठा वेळेवर करणे बंधनकारक राहील. त्याबाबत कांही तक्रार आल्यास किंवा पुरवठादार यांची कामे समाधानकारक नसल्यास किंवा कार्यादेशातील अटी व शर्तीचा भंग झाल्यास मा.पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर यांनी कोणत्याही टप्प्यात सदरचा करार रद्द करण्याचा अधिकार राखुन ठेवलेला आहे.

१०) निविदाराकारास निविदेमध्ये नमुद करण्यांत आलेलेल्या अटी व शर्तीनुसार काम करणे बंधनकारक राहील.

११) अनुदानाअभावी देयकाचे प्रदान करण्यास विलबं झाल्यास पुरवठाधारकास विलंब शुल्काची मागणी करता येणार नाही.

१२) प्रत्येक कामाचे स्वतंत्र शिलबंद दरपत्रक सादर करण्यात यावे.

१३) सदर सुटेभाग पुरवठा करणे कराराचा कालावधी दि.०१/०४/२०२३ ते ३१/०३/२०२४ पर्यंत राहील. सुटेभाग पुरवठा केल्याचे मासिक देयके संबधीत प्रभारी अधिकारी यांचेकड़न प्रमाणीत करुन दर महिन्याच्या ०५ तारखेच्या आत या कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे.

**(मा. पोलीस आयुक्त यांचे मान्यतेने)**

( अपर्णा गिते )
पोलीस उपआयुक्त(मुख्यालय)
पोलीस आयुक्त कार्यालय औरंगाबाद शहर.